खासदार / आमदार या अशासकीय सदस्यांनी बोलाविलेल्या बैठकीस शासकीय अधिकारी यांनी उपस्थित राहणे किंवा करणे विषयी मार्गदर्शक सूचना.

2016010811023786O7

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-१०.०२/९४३/प्र.क्र.२६/२००२/१८(रवका),
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :२६ सप्टेंबर,२००२.

परिपत्रक.

मा.मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ९ जुलै,२००२ रोजी मतदार संघातील विकास कामाच्या संदर्भात घेतलेल्या आढावा बैठकीत संसद सदस्यांनी अशी तक्रार केली,की मतदार संघातील संबंधित अधिकारी त्यांचे म्हणणे ऐकत नाहीत. त्याचप्रमाणे बैठकीसाठी बोलाविले असेल तर सदर अधिकारी येत नाहीत. पालक मंत्र्यांनी लिहून दिलेली कामेसुध्दा अधिकारी करत नाहीत. म्हणून अशा अधिकाऱ्यांच्या ठिकाणी जवाबदार अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात याव्यात.

अशासकीय व्यक्तींनी आयोजलेल्या बैठकीस हजर रहावे किंवा कसे याबाबत शासकीय अधिकाऱ्यांना काही शंका असल्यास खालीलप्रमाणे मार्गदर्शन करण्यात येत आहे-

खासदार / आमदार अशा अशासकीय सदस्यांनी शासकीय अधिकाऱ्यांना चर्चा / भेट/ बैठकीस बोलाविले असेल व अशी भेट / चर्चा / बैठक ही नियमानुसार कार्यालयीन वेळेत कालावधीमधील नसेल तर ते चर्चेसाठी किंवा भेटीसाठी जाऊ शकतील. मात्र त्यावेळी शासनाकडील गोपनीय अथवा संवेदनशील माहिती देण्याचे त्यांनी नाकारणे टाळावे.

जेव्हा पालकमंत्री जिल्ह्याच्या विकासाची कल्याणकारी कामे सांगतील तेव्हा जिल्हास्तरावरील संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांना मदत व सहकार्य करावे. या सूचनांच्या अनुपालनात शासकीय अधिकाऱ्यांकडून कुचराई होऊ नये याची सर्वांनी दक्षता घ्यावी.

वरील सूचना सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणण्यात याव्यात व त्यांना त्या आदेशांचे काटेकोरपणे पालन करण्याच्या सूचना द्याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(व्ही.रंगनाथन)
मुख्य सचिव

प्रति,

१. मा.राज्यपालांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३. मा.उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
४.सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहाय्यक,
५. मुख्य सचिवांचे कार्यालय,
६. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
७. सर्व मंत्रालयीन विभाग,
८. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
९. निवड नस्ती/कार्यासन-१८

C:\Meters\wordbar\...\R...